प्रेसनोट                                                    दिनांक १८/०२/२०२६

ग्रुप ग्रामपंचायत अंबाडी,तालुका भिंवडी जिल्हा ठाणे येथील इतर लोकसेवक स्वपनील सिताराम पाटील, पद –ग्राम पंचायत सदस्य अंबांडी, यांचेविरुध्द लाचलुचपत विभागाकडून सापळा कारवाई झाले बाबत.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | :– | ठाणे |
| गुन्हा नोंद कमांक | :– | गणेशपुरी पोलीस स्टेशन, ठाणे दैनंदिनी क्रमांक १३/२०२६, वेळ १५:१४ दिनांक १८/०२/२०२६, |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :– | इतर लोकसेवक स्वप्नील सिताराम पाटील पद – ग्राम पंचायत सदस्य अंबाडी, तालुका भिंवडी, जिल्हा ठाणे |
| मागितलेलीलाचेची रक्कम | :– | १,७०,०००/– रूपये |
| स्विकारली लाचेची रक्कम | :– | १,७०,०००/–रूपये |
| थोडक्यात हकीकत | :– | यातील तक्रारदार हे बांधकाम व्यवसयिक असुन त्यांनी अंबाडी ग्रामपंचायत हद्दीमध्ये सर्व्हे क्रमाक ११२/२ या ठिकाणी तळमजला अधिक ३ मजले अशी बिल्डींग सर्व परवानगी घेऊन बांधली असुन त्यांची सी सी व ओ सी प्राप्त केली आहे.नमुद बिल्डींगची घरपट्टी व पाणी पट्टी आकरण्याकरीता तक्रारदार यांनी ग्रामपंचायत अंबाडी येथे दिंनाक २७/१०/२५ रोजी अर्ज केला होता.सदरचा अर्ज ग्रामपचायत मासिक सभेमध्ये चर्चेकरीता पटलावर ठेवण्यात आला होता.मसिक सभेमध्ये तक्रारदार यांच्या अर्जावर चर्चेदरम्यान इतर लोकसेवक स्वप्नील पाटील व इतर सदस्य यांनी विरोध दर्शवुन तक्रारदार यांच्या बांधलेल्या बिल्डीगची घरपट्टी व पाणी पट्टी आकरण्यास हरकत घेतली होती तसेच इतर लोकसेवक स्वप्नील पाटील व इतर सदस्य यांनी तक्रारादार यांनी बांधलेली बिल्डीग हि अनाधिकृत असुन त्यांचेवर कारावाई होणेबाबत तहसीलदार यांचे नावे अर्ज केला होता.सदरचा अर्ज दिंनाक २६/१२/२५ रोजी समक्ष तक्रारदार यांच्या व्हॉटस्अॅप वर पाठविण्यात आला होता.दिंनाक १८/१/२०२६ रोजी स्वप्नील सिताराम पाटील यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांनी बांधलेली बिल्डींगची घरपट्टी व पाणीपट्टी आकरण्याकरीता तसेच अनाधिकृत बिल्डींगबाबत केलेला अज मागे घेण्याकरीता १,७०,०००/–लाचेची मागणी केली होती.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने दिंनाक १७/०२/२६ रोजी पडताळणी कारवाई केली असता यातील तक्रारदार यांचेकडे इतर लोकसेवक श्री स्वप्नील सिताराम पाटील वय ३५ वर्षे पद– आंबाडी ग्राम पंचायत सदस्य यांनी १,७०,०००/–रु. लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. दि. १८/०२/२०२६ रोजी सर्व कायदेशिर बाबी पुर्ण करून सापळा कारवाई दरम्यान इतर लोकसेवक श्री स्वप्नील सिताराम पाटील यांना १,७०,०००/– रु. मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारताना १२:३४ वा. रंगेहात पकडण्यात आले आहे. इतर लोकसेवक श्री स्वप्नील सिताराम पाटील वय ३५ वर्षे पद– आंबाडी ग्राम पंचायत सदस्य यांना ताब्यात घेण्यात घेवून यशस्वी सापळा कारवाई करण्यात आली आहे. |

Scanned with OKEN Scanner

मार्गदर्शन अधिकारी १.मा. श्री. शिवराज पाटील,पोलीस अधीक्षक,ॲन्टी करप्शन ब्युरो,ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
२.मा.श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
३.मा.श्री.भागवत सोनावणे, अपर पोलीस अधीक्षक,ॲन्टी करप्शन ब्युरो,ठाणे परिक्षेत्र, ठाणे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते कि, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्याऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता – लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम – ४००६०१
संकेत स्थळ– acbmaharastra@mahapolice.gov.in
Email -spacbthane@ mahapolice.gov.in
ॲप्लीकेशन – acbmaharastra.net
टोल फ्रि नंबर– १०६४
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस्ॲप्स् क्रमांक – ९९३०९९७७००/९७६९६९१०६४

( अनिल जायकर )
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,ठाणे.